पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे
नविन मध्यवर्ती इमारत, ३ रा मजला, पुणे
Ph No- ०२०- २६१२६६२८/२६१२३९८५
Gmail- dirmktms@gmail.com Website- mahapanan.maharashtra.gov.in

जा.क्र.पणन-५/कृउबास / ७ वा वेतन आयोग/शुध्दीपत्रक /सन २०१९ /5992/ दिनांक:30/११/२०१९

विषय - महाराष्ट्र राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समिती मधील कायम कर्मचा-यांना सातवा वेतन आयोग लागु करणेबाबत.

संदर्भ :- १) शासन पत्र क्रमांक कृपम-०७१९/प्र.क्रं.११८/२१-स, दिनांक २६ जुलै २०१९
२) या कार्यालयाचे पत्र क्रमांक पणन-५/७ वा वेतन आयोग/ सन २०१९/३११८/ दि.१४.०८.२०१९
३) बाजार समिती सेवा निवृत्त सचिव -८ यांचे दि.२६.८.२०१९ चे पत्र
४) रामटेक तालुका बाजार समिती, नागपूर यांचे दि. २६.८.२०१९ चे पत्र
५) श्री .दिलीप ल. डेबरे, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य बाजार समिती -कर्मचारी संघ पुणे यांचे दिनांक ६.९.२०१९ चे पत्र .

**-: शुध्दीपत्रक :-**

राज्यातील ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांना त्यांच्या आस्थापनेवरील कायम स्वरुपी कर्मचा-यांना शासकीय कर्मचा-याप्रमाणे वेतन व भत्ते देणे आर्थिकदृष्टया शक्य आहे त्यांनी, त्यांच्या कायम कर्मचा-यांना आस्थापना खर्चाच्या मर्यादेत, शासकीय कर्मचा-यांप्रमाणे, शासनाने जाहीर केलेल्या दिनांकापासुन सातव्या वेतन आयोगानुसार वेतन व भत्ते अदा करणेबाबत योग्य तो निर्णय घेण्यात यावा, असे शासनाने उपरोक्त संदर्भ क्रमांक १, दि.२६ जुलै २०१९ चे पत्राने कळविले होते. त्या अनुषंगाने या कार्यालयाने दिनांक १४.०८.२०१९ रोजी उपरोक्त् संदर्भ क्रमांक २ चे परिपत्रकान्वये तपशिलवार आदेश निर्गमित केले आहेत.

तथापि, उपरोक्त संदर्भ क्रमांक ३,४ व ५ अन्वये सेवानिवृत्ती सचिव, बाजार समिती कर्मचारी संघ यांनी सातवा वेतन आयोग शासकीय कर्मचारी प्रमाणे व शासनाने मंजूरी दिल्याप्रमाणे दिनांक १.१.२०१६ पासुन लागु करावा तसेच त्यासाठी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचे ऐवजी संबधित तालुक्याच्या सहाय्यक निबंधकांची मंजूरी मान्य असावी, अशी मागणी केली आहे.

याबाबत शासन पत्राचे अवलोकन केले असता, बाजार समितीचा आस्थापना खर्च विहीत मर्यादेतच राहील अशा आर्थिक दृष्टया सक्षम बाजार समित्यानांच सातवा वेतन आयोग लागू करता येईल. त्यामुळे बाजार समितीची आर्थिक स्थिती जबाबदार वरिष्ठ अधिका-याने तपासणे आवश्यक असल्याने, जिल्हा उपनिबंधकाचे परवानगीनेच सातवा वेतन आयोग लागू करणे योग्य होईल.

तथापि, शासनाने दिनांक २६ जुलै २०१९ रोजी दिलेल्या पत्रामध्ये बाजार समितीच्या कायम कर्मचा-यांना आस्थापना खर्चाच्या मर्यादेत, शासकीय कर्मचारी प्रमाणे शासनाने जाहीर केलेल्या दिनांकापासुन सातव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन व भत्ते अदा करणेबाबत योग्य तो निर्णय बाजार समितीने त्यांच्या स्तरावरुन घेण्यात यावा असे नमुद केले असल्याने, या कार्यालयाने निर्गमित केलेले उपरोक्त परिपत्रक क्रमांक २ मधील मुद्या क्रमांक ४ मधील अट क्रमांक ४ मध्ये खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

(PTO)

या कार्यालयाचे उपरोक्त नमूद संदर्भ क्रमांक २ चे परिपत्रक जा.क्र.पणन-५/७ वा वेतन आयोग/ सन २०१९ / ३११८/ दि.१४.०८.२०१९ मध्ये अशंत: बदल करुन सदर परिपत्रकातील मुददा क्रमांक ४ मधील अट क्रमांक ४ खालील प्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

४. सुधारित वेतनश्रेणीमध्ये वेतन निश्चित करताना महाराष्ट्र शासनाने वेतन निश्चिती संदर्भात जी पध्दत वेळोवेळी स्विकारलेली आहे, त्यापध्दती प्रमाणेच नवीन वेतनश्रेणीमध्ये वेतन निश्चिती करण्यांत यावी. याबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,दि.३० जानेवारी २०१९ मध्ये सविस्तर सुचना दिलेल्या आहेत. त्यांचे काटेकोरपणे पालन करावे. उपरोक्त संदर्भ क्रमांक १ चे शासन पत्रात नमूद केल्याप्रमाणे, सुधारीत वेतनश्रेणीची अंमलबजावणी शासकीय कर्मचा-याप्रमाणे, शासनाने जाहीर केलेल्या दिनांकापासून करता येईल. तथापी ६ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी दि.०१.०१.२००६ चे दिनांकानंतर केली असल्यास, त्या दिनांकापासून ६ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे त्या दिनांकापासून १० वर्ष पूर्ण झालेनंतरच्या दिनांकास ७ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करता येईल. कोणत्याही परिस्थितीमध्ये सुधारित वेतनेश्रेणी मागील तारेखपासून पूर्वलक्षी प्रभावाने देता येणार नाही.

या कार्यालयाचे उपरोक्त दिनांक १४.०८.२०१९ चे परिपत्रकातील इतर अटी व शर्ती आहेत तशाच लागु राहतील.

( डॉ.किशोर तोष्णिवाल )
पणन संचालक
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,

१. सभापती /सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व )---------
२. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)------------------
३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,(सर्व)---------------------
त्यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व तालुका उप/ सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांना वरील परिपत्रकीय सूचना कळविण्यात यावेत.
४. सरव्यवस्थापक, महाराष्ट राज्य कृषी पणन मंडळ , गुलटेकडी ,मार्केटयार्ड, पुणे-३७
५. श्री .दिलीप ल. डेबरे, अध्यक्ष, महाराष्ट राज्य बाजार समिती कर्मचारी संघ, पुणे
६. कार्यकारी संचालक ,महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ,पुणे
७. बाजार समिती सेवा निवृत्त सचिव- ८
८. सभापती /सचिव ,रामटेक तालुका बाजार समिती, नागपूर

**प्रत- सविनय सादर**

१. मा. प्रधान सचिव , सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई -३२
२. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, म.रा. पुणे